आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
२२ मे २०२६ - शुक्रवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात द्विपक्षीय चर्चा

- दहा राज्यांमधल्या राज्यसभेच्या २४ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी १८ जूनला मतदान

- ओदिशामधल्या गंजाम जिल्ह्यात रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू, तर चार जण जखमी

**आणि**

- महाराष्ट्रात विदर्भ तसंच उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशात आज आणि उद्या उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि सायप्रसचे अध्यक्ष निकोस क्रिस्टो डुली डेस यांच्यात नवी दिल्लीत हैदराबाद हाऊस इथं आज द्विपक्षीय बैठक  झाली. या चर्चेत व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान, शिक्षण, संस्कृती, स्थलांतर, संरक्षण आणि सुरक्षा, कृत्रिम बुद्धिमत्ता, फिनटेक, नवोन्मेष आणि संशोधन अशा विविध क्षेत्रांतील सहकार्य अधिक मजबूत करण्यावर भर देण्यात आला. तसंच प्रादेशिक आणि जागतिक महत्त्वाच्या मुद्द्यांवरही दोन्ही नेत्यांनी सविस्तर चर्चा केल्याची माहिती  परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं  दिली.

दोन्ही नेत्यांमध्ये द्विपक्षीय चर्चेपूर्वी निकोस क्रिस्टो डुली यांनी राजघाट इथं जाऊन महात्मा गांधींच्या स्मृतीस्थळावर जाऊन  अभिवादन केलं. त्यानंतर भारताचे परराष्ट्र व्यवहामंत्री एस. जयशंकर यांनी  निकोस यांची भेट घेतली. यावेळी भारत-सायप्रस देशांतील संबंध तसंच भारत-युरोपियन संघ सहकार्याबाबत निकोस यांनी व्यक्त केलेल्या सकारात्मक भूमिकेचं जयशंकर यांनी कौतुक केलं.

सायप्रसचे अध्यक्ष निकोस उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळासह चार दिवसांच्या भारत दौऱ्यावर आले आहेत. या प्रतिनिधी मंडळात सायप्रसचे काही मंत्री आणि उद्योजकांचाही समावेश आहे. सायप्रसच्या अध्यक्षांचा हा पहिलाच भारत दौरा आहे. आज सकाळी निकोस

नवी दिल्लीत दाखल झाले, त्यावेळी केंद्रीय राज्यमंत्री अजय टमटा यांनी त्याचं स्वागत केलं. आज संध्याकाळी निकोस हे राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची राष्ट्रपती भवनात जाऊन भेट घेणार आहेत. निकोस यांच्या सन्मानार्थ राष्ट्रपती भवनात स्नेहभोजनाचं आयोजन करण्यात आलं आहे. दरम्यान, नवी दिल्लीत येण्यापूर्वी निकोस यांनी मुंबईला भेट दिली आणि तिथे आयोजित कार्यक्रमात सहभागी झाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली केंद्रीय मंत्रीमंडळाची बैठक काल नवी दिल्लीत झाली. या बैठकीत राहणीमान सुलभता आणि व्यापाराला चालना देण्यासाठी विविध उपाययोजनांवर सविस्तर चर्चा झाल्याची माहिती प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर लिहिलेल्या संदेशातून दिली. याच बैठकीत विकसित भारताचं स्वप्न प्रत्यक्षात आणण्यासाठी केले जात असलेले प्रयत्न अधिक काटेकोर कसे करता येतील, यावरही चर्चा झाल्याचं या संदेशात नमूद केलं आहे.

**<><><><><>**

दहा राज्यांमधल्या राज्यसभेच्या २४ जागांसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीचं वेळापत्रक निवडणूक आयोगाने आज जाहीर केलं. ही निवडणूक १८ जूनला होणार असून त्याचदिवशी मतमोजणी होणार आहे. १ जून रोजी निवडणुकीसाठीची अधिसूचना जारी केली जाईल, असं निवडणूक आयोगाने सांगितलं. माजी प्रधानमंत्री एच. डी. देवेगौडा, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग हे राज्यसभा सदस्य पुढल्या महिन्यात निवृत्त होत आहेत. तसंच आंध्रप्रदेश, गुजरात आणि कर्नाटकातल्या प्रत्येकी चार, राजस्थान आणि मध्यप्रदेशातल्या प्रत्येकी तीन, झारखंडमधल्या दोन आणि मणिपूर, मेघालय, अरुणाचल प्रदेश आणि मिझोराममधली प्रत्येकी एक जागा रिक्त होणार आहे.

याशिवाय राज्यसभेच्या दोन जागांसाठीची पोटनिवडणूकही निवडणूक आयोगाने आज जाहीर केली. महाराष्ट्राच्या उप मुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि अण्णा द्रमुकचे नेते सी. व्ही. षण्मुगम हे विधानसभेवर निवडून गेल्यामुळे या दोन जागा रिक्त झाल्या आहेत. पोटनिवडणुकीसाठीही १८ जूनलाच मतदान होणार आहे.

**<><><><><>**

आयआरसीटीसी हॉटेल घोटाळ्या प्रकरणी राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालु प्रसाद यादव, त्यांचे कुटुंबीय आणि इतरांविरुद्ध आरोप निश्चित करण्याचा निर्णय दिल्ली न्यायालयाने ९ जूनपर्यंत पुढे ढकलला आहे. या प्रकरणी सीबीआयने गुन्हा नोंदवला होता, याचा तपास ईडी अर्थात सक्तवसुली संचलनालय करत आहे. २००४ ते २००९ या कालावधीत लालुप्रसाद यादव रेल्वेमंत्री असताना आयआरसीटीसी हॉटेल चालवण्याची कंत्राटं देताना अनियमितता झाल्याचा आरोप ईडीने केला आहे. विहित प्रक्रियेचं पालन न करता हॉटेलची देखभाल करण्याचं कंत्राट एका खासगी कंपनीला दिलं होतं, या कंपनीचे संचालक लालुप्रसाद यादव यांचे निकटवर्तीय होते, या बदल्यात यादव यांच्या कुटुंबीयांशी आणि सहकाऱ्यांशी संबंधित एका बेनामी कंपनीने तीन एकर जमीन संपादित केली असंही ईडीने म्हटलं आहे. या प्रकरणात लालुप्रसाद यादव, त्यांच्या पत्नी राबडी देवी, पुत्र तेजप्रताप आणि तेजस्वी यादव आणि पुत्री मिसा भारती आणि हेमा यादव आरोपी आहेत.

**<><><><><>**

ओदिशामधल्या गंजाम जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात सहा जणांचा मृत्यू झाला तर चार जण जखमी झाले आहेत. बसने ऑटोरिक्षाला धडक दिल्यामुळे हा अपघात झाला. ही बस बेहरामपूर इथून पुरुषोत्तमपूर ला जात होती. जखमींवर उपचार सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं. मृतांची ओळख अद्याप पटली नाही.

**<><><><><>**

महाराष्ट्रात चंद्रपूर इथं तेंदूपत्ता गोळा करणाऱ्या चार महिलांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची माहिती वन अधिकाऱ्याने दिली आहे. सिंदेवाही तालुक्यातल्या गुंजेवाही गावातल्या या महिला आज पहाटे तेंदूपत्ता गोळा करण्यासाठी गेल्या होत्या, त्यावेळी वाघाने त्यांच्यावर हल्ला केला, यात त्यांचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर वनविभागाचं पथक घटनास्थळी पोचल्याचं चंद्रपूर परिमंडळाचे मुख्य वनसंरक्षक आर. एम. रामानुजन यांनी सांगितलं.

**<><><><><>**

रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आजपासून दोन दिवसांच्या राजस्थान दौऱ्यावर असून त्यांनी आज जोधपूर इथं विविध रेल्वे सेवांचं उद्घाटन केलं.

त्यानंतर ते जोधपूरहून जालोरला जाणार असून तिथे ते भुज-नवी दिल्ली रेल्वे सेवेचा शुभारंभ करणार आहेत. पालीमध्ये अमृत भारत योजनेअंतर्गत सुरू असलेल्या पुर्नविकास कामांचा ते आढावा घेतील.

<><><><>

येत्या २६ मे रोजी क्वाड परराष्ट्र मंत्र्यांची बैठक नवी दिल्लीत होणार आहे. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रूबियो, ऑस्ट्रेलियाचे परराष्ट्र मंत्री पेनी वोंग आणि जपानचे परराष्ट्र मंत्री तोशिमित्सू मोटेगी या बैठकीत सहभागी होणार आहेत. या बैठकीत क्वाड देश मुख्य क्षेत्रांमधल्या सहकार्यावर विचारांची देवाणघेवाण करतील आणि सुरू असलेल्या उपक्रमांचा आढावा घेतील. इंडो-पॅसिफिक क्षेत्रातल्या घडामोडी आणि आंतरराष्ट्रीय मुद्दयांवरही ते चर्चा करतील. या दौऱ्यादरम्यान भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ.एस.जयशंकर यांच्यासोबत त्यांच्या द्विपक्षीय बैठका होणार असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचीही ते भेट घेण्याची शक्यता आहे.

<><><><>

CBSE माध्यमातल्या इयत्ता ९ वीच्या विद्यार्थ्यांना तीन भाषा सक्तीच्या नव्या धोरणाच्या विरोधात आव्हान देणाऱ्या जनहित याचिकेवर पुढील आठवड्यात सुनावणी करण्यास सर्वोच्च न्यायालयानं सहमती दर्शवली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या खंडपीठासमोर ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी यांनी आज बाजू मांडली.

<><><><>

२०२० च्या दिल्ली दंगलीच्या कटात सहभागी असल्याच्या आरोपाखाली अटकेत असलेला विद्यार्थी नेता उमर खालीद याला दिल्ली उच्च न्यायालयाने तीन दिवसांचा अंतरिम जामीन मंजूर केला आहे. न्यायाधीश न्यायमूर्ती प्रतिभा सिंग आणि मधु जैन यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. आईची शस्त्रक्रिया असल्यानं उमर खालीदला १ जून ते ३ जून दरम्यान जामीन दिला आहे.

<><><><>

देशाच्या काही भागात आज उष्णतेच्या लाटेचा इशारा तर काही भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा इशारा भारतीय हवामान विभागानं दिला आहे.

देशात उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश तसंच महाराष्ट्रात विदर्भात आज आणि उद्यासाठी उष्णतेच्या लाटेचा रेड अलर्ट देण्यात आला आहे. तर दिल्ली, हरियाणा आणि चंदीगडला ऑरेंज अर्लट दिला आहे. पंजाब, बिहार, छत्तीसगड, झारखंड, ओदिशा, राजस्थान, तामिळनाडू, पुद्दुचेरी, काराईकल आणि तेलंगणा या राज्यांतही पुढील दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला आहे. पश्चिम बंगाल, ओदिशा इथं आज आणि उद्या तापमानात वाढ आणि हवेतील आर्द्रता वाढण्याचा अंदाज आहे.

उत्तर भारताचा काही भाग, हिमालया जवळचा पश्चिम बंगालचा भाग, कर्नाटकच्या दक्षिणेकडील भागात मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

**<><><><><>**

श्रीलंकेत नैऋत्य मोसमी वारे हळूहळू स्थिरावत असल्याने या द्वीप राष्ट्रात पावसाचा जोर वाढण्याची आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता आहे. पश्चिम, सबरगमुवा आणि वायव्य प्रांतांच्या काही भागांमध्ये २०० मिलीमीटर पेक्षा जास्त अतिवृष्टी होऊ शकते असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**